**ISSN 0976-0377**
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**Editor In Chief**
**Dr. Balaji Kamble**

RNI. MAHMUL02805/2010/33461

IMPACT FACTOR 6.20

ISSN 0976-0377

*International Registered & Recognized Research Journal Related to Higher Education for all Subjects*

# INTERLINK RESEARCH ANALYSIS

**REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL**

**Issue : XXVII, Vol. II**
**Year - 14 (Half Yearly)**
**(Jan. 2023 To June. 2023**

**Editorial Office :**
'Gyandeep',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 8484818000**
09423346913,09637935252,
09503814000,07276301000

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
irasg1411@gmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com
drkamblebg@rediffmail.com

**Publisher :**
Jyotichandra Publication,
Latur, Dist. Latur.-415331
(M.S.) India

**Price: ₹ 200/-**

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya, Latur, Dist. Latur (M.S.)
Mob. 09423346913, 9503814000

**EXECUTIVE EDITORS**

**Dr. Aloka Parasher Sen**
Professor, Dept. of History & Classics,
University of Alberta, Edmonton,
(CANADA).

**Dr. Laxman Satya**
Professor, Dept. of History,
Lokhevan University, Loheavan,
PENSULVIYA (USA)

**Dr. Huen Yen**
Dept. of Inter Cultural
International Relation
Central South University,
Changsha City, (CHAINA)

**Bhujang R. Bobade**
Director, Manuscript Dept.,
Deccan Archaeological and Cultural
Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. Rajendra Gawhale**
Head, Dept. of Economics,
G. S. Mahavidyalaya,
Khamgaon, Dist. Buldana (M.S.)

**Dr. Nilam Chhangani**
Head, Dept. of Economics,
S.K.N.G. Mahavidyalaya,
Karanj Lad, Dist. Washim (M.S.)

**Dr. G.V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITORS**

**Dr. S.D. Sindkhedkar**
Vice Principal
PSGVP's Mandals College,
Shahada, Dist. Nandurbar (M.S.)

**Veera Prasad**
Dept. of Political Science,
S.K. University,
Anantpur, (A.P.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics
Maharashtra Mahavidhyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Johrabhai B. Patel,**
Dept. of Hindi,
S.P. Patel College,
Simaliya (Gujrat)

**CO-EDITORS**

**Sandipan K. Gaike**
Dept. of Sociology,
Vasant College,
Kej, Dist. Beed (M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani,Dist. Parbhani.(M.S.)

**Ambuja N. Malkhedkar**
Dept. of Hindi
Gulbarga, Dist. Gulbarga,
(Karnataka State)

**Dr. Shivanand M. Giri**
Dept. of Marathi,
B.K. Deshmukh College,
Chakur Dist. Latur.(M.S.)

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Food Processing Sector for Make in India<br>**Avinash Ramkrishna Pawar** | 1 |
| 2 | Babasaheb Ambedkar and his Philosophy of Land Reform<br>**Dr. D. K. Rathod** | 10 |
| 3 | A Sociological Visions on the Impact of Globalization on Indian Rural Women<br>**Dr. R. T. Kulsange** | 18 |
| 4 | 'उठाईगीर' स्वकथन 'पाथरुट' जनजाति की वेदना<br>**डॉ. सुर्यकांत दळवे** | 25 |
| 5 | फणिश्वरनाथ रेणु का 'मैला आंचल' एक अभ्यास<br>**डॉ. जितेंद्र प्रताप शेळके** | 30 |
| 6 | बचत गट : स्त्री सक्षमीकरणाचा राजमार्ग<br>**डॉ. माला पुंडलिकराव बारापात्रे** | 35 |
| 7 | अरुण काळे यांच्या कवितेतील दलित जाणीव<br>**प्रतिभा कृष्णराव आवंडकर** | 42 |
| 8 | राजनीतिक भ्रष्टाचार लोकतंत्र के लिए खतरा<br>**डॉ. चंद्रशेखर आजाद** | 48 |
| 9 | महात्मा बसवेश्वराच्या विचारातील सामाजिक प्रजाप्रभुत्व<br>**डॉ. प्रकाश पानतावणे** | 54 |
| 10 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि प्रथम गोलमेज परिषद<br>**डॉ. विजय आर. खोब्रागडे** | 59 |

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/

# अरुण काळे यांच्या कवितेतील दलित जाणीव

**प्रतिभा कृष्णराव आवंडकर**
मराठी विभाग,
श्रीमती राधाबाई सरडा महाविद्यालय,
अंजनगाव सुर्जी, अमरावती

7 **Research Paper - Marathi**

नव्वदच्या दशकानंतर मराठी कवितेतील एक महत्त्वाचे नाव म्हणजे अरुण काळे. १९९३ स*** अरुण काळेंचा पहिला कविता संग्रह ' रॉकगार्डन'प्रकाशित झाला.नंतर १९९७ स***'सायरन चे शहर'आणि त्यानंतर दहा वर्षांनी' नंतर आलेले लोक'तीनही संग्रहामध्ये १६६ कविता आहे. नियतकालिकातून त्यांच्या काही कविता असंग्रहित स्वरूपात पाहायला मिळतात. या तीनही संग्रहातील कवितांमधून अरुण काळे यांचा एक विकास क्रम पाहावयास मिळतो. समकालीन मराठी कवितेची सगळी समीक्षक सुलभ वर्गी करणे ओलांडून या तीनही संग्रहातील अरुण काळे यांची कविता मूल्यभान आणि स्वच्छ दृष्टी यांच्या बळावर ठामपणे उभी राहते. आज आणि समकाल यांच्या संदर्भात सामान्य माणसांची जगणे हे त्यांच्या कवितेचे प्रमुख असे सूत्र होय.

'नंतर आलेले लोक'या काव्यसंग्रहातील त्यांची कविता अभावग्रस्तांच्या वेदनांचे प्रत्येकाची चित्रण करते. विशेषतः जागतिकीकरणातील पडझडीचे आणि नेमके विदारक चित्रण त्यात आढळते. माहिती तंत्रज्ञानाचे कोलित माकडाच्या हाती सापडलेल्या आजच्या आयटीच्या युगात दलितांना डिलीट करण्यासाठी रोज नवनवीन सॉफ्टवेअर येत आहे. अशावेळी शोषितांनी अँटीव्हायरस खबरदारी घ्यायला हवी अशी आधुनिक परिभाषेतील जाणीव ही कविता व्यक्त करते.

आशय आणि अभिव्यक्ती मध्ये कालनिर्णय बदल झालेले आढळतात. एक विशिष्ट करा ठरवून गेलेली असत नाही. काळानुसार अवतीभोवतीच्या बदलानुसार आपल्या विचार क्रमांत बदल होत जातात. परीपक्वता येत जाते. सायरांची शहर (१९९७) आणि नंतर आलेले लोक (२००६) या संग्रहात सुमारे दहा वर्षाचे अंतर आहे. या दहा वर्षात एकूणच जगाचा चेहरा मोहरा कसा व किती बदलला हे सर्वजण जाणतात. भारतीय स्तरावरील या दहा वर्षात आर्थिक बदलाबरोबरच -छोटी मोठी युद्ध, विविध विचारसरणीच्या पक्षाची राजकीय सत्तांतरे, गोध्रा हत्याकांड,खैरलांजी सारख्या घटना, सुनामी सारखी भीषण नैसर्गिक आपत्ती, आंतरराष्ट्रीय पटलावर दहशतवादी कारवाया, वर्ल्ड ट्रेड सेंटर वरील हल्ला, इराक हल्ला, अफगाण संहार, माहिती दळणवळण क्षेत्रात झालेली भयंकर क्रांती.बदललेली अर्थव्यवस्था, जाणारी समाजव्यवस्था, माणूस पण हरवने आज २०२३ पर्यंत २०१४ पासून झालेली सत्तांतर, करोना काळात बदललेली सामाजिक आर्थिक सांस्कृतिक आंतरराष्ट्रीय

बदल सीमावाद ३७० कलम हटवणे. रशिया युक्रेन युद्ध, जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम त्यामध्ये सर्वसामान्य लोकांची होणारी दैना अवस्था, घटना आजही घडत आहे या सगळ्यांचा एकत्रित परिणाम समाजात ढासळणारी मुल्ये दिसतच आहे आपण ती ओळख उघड्या डोळ्यांनी पाहतो पण त्यावर आपण विचार करत नाही ही विचार शून्यता घालवण्यासाठी अरुण काळे यांची कविता आजही समाजाला मार्गदर्शन करत आहे. ज्या काही भौतिक व आर्थिक सुधारणा आपण घडवून आणतोय ज्या गोष्टी जागतिकीकरणाद्वारे प्राप्त करतोय त्याचा विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे या सर्व पार्श्वभूमीवर अरुण काळे यांची कविता आपल्याला आपल्या इतिहासाची परंपरांची समाजव्यवस्था भेदांची पार्श्वभूमी आणि तिची सखोल समज देऊन नंतर आलेले लोक मधील कविता बदललेल्या पर्यावरणाचे आव्हान स्वीकारून जागतिकीकरणाचा तसेच राजकारणाचा तसेच समाजकारणाचा तसेच दुटप्पीपणाचा घरा चेहरा आपल्यासमोर अरुण काळे यांची कविता आणते आणि या संदर्भात बोलताना अरुण काळे म्हणतात.

**माहितीच्यास्फोटात/उडततातजाहीरनामे/माहितीच्या बैलांना/माणूस नाही माहित/आज किती अर्धपोटी झोपलेत? आज किती जागे झाले आहे पोट धरून?/चालू आर्थिक वर्षात/?(माहितीचे माहितगार पृष्ठ ७३)**

अरुण काळे यांची कविता मुख्यत्वे एका विचाराने प्रकटीकरण करणारी, सामाजिक वास्तव मांडणारी, तिच्यातील गुंते समुर्त करणारीकविता आहे.

समकालीन कवितेत एखादा अपवाद वगळता बहुसंख्य कवी गद्य विधान स्वरूपाची कविता मोठ्या प्रमाणात लिहिताना दिसतात. तीव्र स्वरूपाची भावनिकता. अनुभवाचा चढास्वर, वक्तृत्व बाजी यामुळे विशेषतः दलित कविता एकापरिघात फिरताना दिसते. या पार्श्वभूमीवर अरुण काळे यांच्या कवितेचे वेगळेपण नजरेत भरते. त्यांच्या संवेदनशीलतेने रुढचाकोरीपेक्षा वेगळे वळणघेतल्याचे दिसते. कवितेच्या कक्षा विस्तारणारी कविता मराठीत अरुण काळे यांनी अलीकडच्या काळात लिहिल्यामुळे त्यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या दलित जाणीवा यापूर्वीच्या दलित कवींच्या जाणीवे पेक्षा अधिक विकसित होत गेलेल्या.

जागतिकीकरणाच्या वर्तमानाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांच्या जगण्याविषयी, संवेदनाविषयी काही सांगू पाहत आहे अरुण काळे यांची कविता. दलित-जनवादी-नवतावादी-स्त्रीवादी अशा अनेक अनेक वृत्ती प्रवृत्तीच्या पलीकडे जाऊन निखळ मानवतावादी जाणिवांनी व्यक्त होत आहे.एकूण निष्कर्षावरून व्यापक अर्थाने अरुण काळे यांची कविता सर्वात आधीही बहुजनवादी आवाजाची कविता आहे.

**अरुण काळे यांच्या कवितेतील वैश्विकता**

'रिकाम्या बाटलीसारखा'हया कवितेतून व्यक्त होणारी दलित जाणीव ही चळवळीच्या कार्यकर्त्याची आहे म्हणूनच ती वैयक्तिक न राहता वैश्विक होते.

**बिसलेरीची बाटली/निळ्या झाकणाची/तसाच तो निळी टोपीवाला/आयएसआय मार्क सारखा/**

**पक्षाचा बिल्ला त्याच्या छातीवर/प्रवासात हट्टी भावंड/पाण्याची बाटली वापरतात/नंतर फेकाफेकी सुरू होते. वेस्टन फाटतं तसं त्याचं केलं/अति महत्त्वाकांक्षी लोकांनी/मगतो टोपीच्या साधारण राहिला/छातीवर बिल्ला नसल्याने दुर्लक्षित झाला/शेवटी चैत्यभूमीच्या रस्त्यावर/निपचित पडला/ रिकाम्या बाटली सारखा.(रिकामी बाटलीसारखा,पृष्ट क्रमांक २९)**

आंबेडकरी चळवळीतून अरुण काळे यांचा उदय झाल्यामुळे त्यांच्या कवितेतून मानवतावादी असण्याची अपरिहार्यता दिसते म्हणून त्यांची कविता त्यामधला अनुभव हा वैयक्तिक न राहता वैश्विक दिसतो त्यामुळे दिखाऊ प्रेमापेक्षा प्रेम या शाश्वत मूल्याबद्दल त्यांची कविता आपल्याशी बोलत राहते.

**अरुण काळे यांच्या कवितेतील युगप्रवर्तक जाणिवा**

अरुण काळे यांच्या कवितेने युगप्रवर्तक जाणीव व्यक्त केल्यामुळे मराठी सभेचे नवता जे म्हटले जाते ते अरुण काळे यांच्या कवितेने प्रस्थापित केले आहे जागतिक पातळीवर इतिहास काळापासून वर्तमानापर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी घुसखोरी करून स्थानिकांना, मूळनिवासी यांना दिन,दलित,दास, आणि गुलाम केले याची जाणीव त्यांच्या 'चोखा म्हणे' या कवितेतून व्यक्त होत असताना दिसते.

'तनगाडलं स्वतःला पावसा पाण्यात/
थंडी वाऱ्यात दोन टायमालान चुकता/
घेतली अफूची गोळी झ्याट आराम नाही/झेंड्या सोबत कायम ठेवली पायरी/खपाखप वाऱ्या केल्या/
दारावून तीन तीनदा चकरा मारल्या/पण दार दिसू दिले नाही/
(चोखाम्हणे,पृ. ८९)

ही भावना संत चोखामेळा आपण अस्पृश्य असल्यामुळे विठोबाचे दर्शन घेऊ शकत नाही ही भावना व्यक्त करताना 'मजदूर दूर हो म्हणसी,तुज भेटू कोण्या रिती'

अरुण काळे यांनी चोखामेळायांचे दुःख व्यक्त केले आहे अशा सर्वांच्या वतीने अरुण काळे यांची कविता मुखरीत झाली आहे. यावरून त्यांच्या कवितेची व्याप्ती कितीतरी मोठी आहे याचा प्रत्यय आपल्याला येतो त्यातून युगप्रवर्तक जाणीवा जाणवल्याशिवाय राहत नाही.

**तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा:-**

अरुण काळे यांची डॉक्टर बाबासाहेब वर विश्वास व आसक्ती 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा'या कवितेतून दिसतो.

'पोरगं हरवु नये म्हणून/बाप पुढे जाऊनरस्त्यावर वर उभा राहतो/तसा तू पुढे आलास/ एकविसाव्या शतकात आमच्याही आधी.
(तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा पृ.३७)

**जागतिकीकरण आणि दुभंगलेले समाजमनव अरुण काळे यांची कविता**

'भारत ही एक जागतिक झोपडपट्टी आहे 'असे यांनी म्हटले आहे. या झोपडपट्टी बद्दल,

जगातल्या झोपडपट्ट्यांतील दलितांबद्दल, त्यांच्या होणाऱ्या आणि झालेल्या मुस्कटदाबी बद्दल, त्यांच्या वागणुकीबद्दल, ससेहोलपटी बद्दल, डिलीट केल्या गेलेल्या दलितांबद्दल अरुण काळे यांची कविता कळवळ्याने बोलत राहते, भांडत राहते.

ज्या सुसंस्कृत समजणाऱ्या समाजाने पावलोपावली अपमान केला त्या विषाणूंना अँटिव्हायरस रसायनातबुचकाळून काढतेती अरुण काळे यांची कविता! आजवरच्या दलित कवितेतून व्यक्त झालेले दुःख हे चातुरवर्ण्या वर आधारित असणाऱ्या समाज व्यवस्थेने दुभंगलेल्या समाजमनाची तडफड व्यक्त करते ती अरुण काळे  यांची कविता ! ते दुःख इथेही आहेचमात्र जागतिकीकरणाने व नव्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीने त्यांच्या दुर्गतीला दिलेली नवी दिशा काळे यांनी अधोरेखित केली आहे.

सनातन मोडस ऑपरेंडी, खिडकी उर्फ विंडो: २००१:२, खिडकी उर्फ विंडो: २०००:२, रिकाम्या बाटली सारखा, तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा, वॉटर किंग्डमः एक, वॉटर किंग्डम : २, चोखाम्हणे आणि मला ओळखायची काम मान्सूनपूर्व इत्यादी कवितांमधून व्यक्त होणारी दलित जाणीव ही पूर्व सुरींच्या कवितेतील जाणीव पेक्षा निश्चितच वेगळी आहे .कारण या कवितेतून व्यक्त होणारी जाणीव ही वैश्विक आह.

"शोषितांचा पक्ष मांडणारी अरुण काळे यांची कविता वर्तमान वास्तवाचा विरूप, क्रूर अन पिसाट चेहरा थेटपणे मांडून अरुण काळे यांना त्या प्रकारे नंतर आलेल्या लोकांसंबंधी आधीच्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून कवी बोलत आहे का? असा प्रश्न उपस्थित केला असेल तर याचे उत्तर नकारार्थी मिळते कारण कवी दलितांच्या जगण्यातलं दुःख वंचना याची मांडणी करतो पण ती दलित जातीपूर्ती नसते रोड अर्थानं ती दलित कविता नसतेच ज्याप्रमाणे दलित संकल्पनेची व्यापक मांडणी बाबुराव बागुल, नामदेव ढसाळ यांना अभिप्रेत आहे त्या संकल्पनेला अनुसरणारी ही शोषित समाज समूहाची कविता आहे"

अरुण काळे यांच्या कवितेतील महानगरीय जाणीवअरुण काळे यांची कविता जागतिकीकरणाच्या बाजार संस्कृतीवर बोलते, माहिती क्रांतीचे अंतरंगही उलगडून दाखवते आणि त्या क्रांतीच्या अग्रक्रमात अगदी करण झाले आहे या प्रश्नांविषयी बोलत राहते.

१९८० नंतर जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. खेड्यांचे शहरीकरण होऊ लागले.शहरांचे स्वरूपही अंतरबाह्य बदलू लागले.माध्यम क्रांतीनेजीवनात लखलखाट आणला.मॉल्सनी आपले जाळे पसरले.शहरातील गिरण्या हळूहळू बंद पडत गेल्या असंख्य दलित कामगार यामुळे देशोधडीला लागले ही स्थिती काळे यांनी'माहितीचे माहितगार'यामध्ये व्यक्त केली आहे.

माहितीच्या स्फोटात/उडतात जाहीरनामे/माहितीच्या बैलांना/माणूस नाही माहित/आज किती अर्धपोटी झोपलेत?/चालू आर्थिक वर्षात/कीती जणांची झालीअवहेलना?
(माहितीचे माहितगार पृ.७३)

महानगरीय जीवनात मानवी संबंध झपाट्याने बदलत आहे. जगण्यातील साऱ्या गोष्टीचे वस्तूकरण होत आहे. महानगरामध्ये उत्पादन, मार्केटिंग, ग्राहक मूल्य, या गोष्टींना अतोनात महत्व

आले आहे, शहरी जीवनातच नव्हे खेड्यापाड्यांपर्यंत ते विध्वंसि आक्रमण झपाट्याने विस्तारत आहे. त्याची काडी बाजू ही कविता प्रभावीपणे व्यक्त करते.'सिताराम मास्तराचं अगतिकिकरण 'या कवितेतही हा उपरोध साधलाआहे.अगतीकिकरण हा शब्दप्रयोग इथे जाणीवपूर्वक मांडला आहे. सिताराम मास्तर ,गोड गळ्याचा वाजंत्री ताफेवाला, सनई फुंकणारा, मोठ्या सन्मानाने जगतो. मात्र या महानगरातील नव्या काळामध्ये दुकानदारी व बाजारामुळे त्याच्या मनात काही प्रश्न निर्माण होतात.

"सायबर युगाने माणसाची कोंडी केली. नवे युग अवतरले म्हणून विषमता कमी झाली नाही. मॉल्स पासून पान ठेल्यापर्यंत आणि स्पेसशटल पासून सायकल रिक्षा पर्यंतचे हेलपाटे ही विषमता कायमच आहे. नव्या रूपात 'आहे रे -नाही रे'ही दरी रुंदावत केली आहे. एकीकडे सर्व प्रकारच्या बलसत्ता आणि दुसरीकडे सर्व वंचितांची दुबडी दुनिया अशा लढाईत दुबळ्यांचा पराभव अटळ आहे"

"युद्ध सर्व जाती धर्माच्या/लोकांसाठी खुले आहे/हे युद्ध उतरले आहे रणभूमीवरून/रस्त्यात या शतकातसहस्रकात "

(अर्थ युद्ध पृ.८)

जगतीकरणातील, जाहिरातीतीलगुळगुळीत आणि झगमगीत जग एकीकडे तर दुसरीकडे भुके कंगाल आणि डिलीट केल्या गेलेले लोक हा प्रखर विरोधाभास मांडून काळेच्या कवितेने आजच्या युगाचा लेखाजोखा आपल्यासमोर ठेवला आहे.

भोवतालच्या बदललेल्या वास्तवांचे फक्त वर्णन करून कवी थांबत नाही तर आजच्या माणसासमोरच्या नैतिक आध्यात्मिक पेचाना ते शब्दांच्या चिमटीत अचूक पकडतात. काल - वर्ण-लिंग - धर्म याच्या आधारावर केल्या जाणाऱ्या द्वेषाचे जे बडी ठरले होते तेच आज माहितीच्या स्फोटामुळे सर्वात वाईट रित्या बळी पडत आहेत. एकूणच हे जागतिकीकरण म्हणजे कवीला उपेक्षितांचे अगतिकीकरण नच वाटत राहते. या ग्लोबल उलथापालतीमध्ये नाती- प्रेम- संवाद-आपुलकी हे सर्व लयाला तर जाणार नाही ना अशी शंका त्यांना त्रस्त करते.

बापानेमुलाला विचारलं/कितव्या वर्गात शिकतोस?/मुलाने बापाला विचारलं/तुमचंपूर्ण नाव काय? (,प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण पृ.३९)

अनेक प्रश्नांनी वाचकांना वतीत केले आहे. आणि जागतिक संदर्भातील समांतर चाललेल्या गोष्टींचा प्रत्येक अरुण काळे यांनी त्यांच्या कवितेने दिला आहे.

जागतिकीकरणाच्या प्रभावामुळे बकाल होत गेलेले महानगरीय जीवन काळे यांनी अत्यंत तीव्र संवेदनेने येथे मांडले आहे. दोन वेळच्या उदरनिर्वाहाची सोय लावण्यासाठी घरातून बाहेर पडलेला श्रमिक दलित संध्याकाळी घरी परततो की नाही आणि जर परतलास तर त्याच्या हाती काही असेलच याचीही खात्री नाही. जीवन जाणिवा बोथट झालेल्या या महानगरामध्ये जगण्यासाठी करावा लागणारा संघर्ष हा कमालीच्या तीव्र पातळीवरचा आहे." सर्वत्र बोकाळलेला अक्कलकोटेपणा, प्रत्येकाची न संपणारी भूक ,साध्य तेवढी महत्वाची मानून की कोणत्याही सुक्ता सूक्त मार्गाने पदरात

पाडून घेणे हाच पुरुषार्थ,बळी तो कान पिळी हा जंगलचा कायदा, त्यात दुबळ्यांचे अटल झालेले मरण, त्याबद्दल कोणालाही ना खेद ना खंत, सबळ साधनांचा चंगळ वाद, आणि बेपर्वा राज्यकर्त्यांचा सत्तेचा सोस या आजच्या महानगरीय वर्तमानावर झगझगीत प्रकाशझोत अरुण काळे यांची कविता टाकते"

**निष्कर्ष :-**

१) भारतीय कवितेतील नवे वळण अरुण काळे यांची कविता एकूणच मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा ठरतो.

२) अरुण काळे यांच्या कवितेच्यापुढे इतर कोणती कविता जाऊ शकेल असे वाटत नाही असे महेंद्र भवरे हे समीक्षक म्हणतात

३) नंतर आलेले लोक सारख्या कविता पुन्हा निर्माण होतील याबद्दल भविष्य वर्तवता येत नाही.

४) अरुण काळे यांच्या कवितेचे साम्राज्य २१ व्या शतकातील पहिल्या दशकावर निर्माण झालेल्या आहेत.

५) अरुण काळे यांच्या कवितेला इतिहासामध्ये मरण नाही ती कालातीत आहे कोणत्याही काळातील काळाच्या कसोटीवर उतरणारी आहे

६) बदलत्या युगाच्या संवेदना एवढ्या ताकदीने आजवरच्या मराठी कवितेने मांडल्या नाहीत.

## संदर्भ सूची :-

१) संतोष पद्माकर पवार,"अरुणच्या कवितेतील माना मान करताना"

२) "नवाक्षरदर्शन" (अरुण काळे स्मृती विशेषांक)'संपादकप्रवीन बांदेकर

३) रंगनाथ पठारे इतिहासावरचा विषाणू दाखवणारी कविता,कवितारती, संपादक पुरुषोत्तम पाटील दिवाळी अंक

४) भा.ल.भोळे नंतर आलेले लोकः समकालीनतेचे आव्हान यथार्थपणे समजून घेणारी कविता""युगवाणी", संपादक नारायण कुलकर्णी कवठेकर जानेवारी फेब्रुवारी मार्च २००७

५) उनी महेंद्र भवरे

६) महेंद्र भवरे- बंडखोर फकीर 'नवाक्षर दर्शन'

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/